माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२०२८७० / २० /अ.क्र.१४३७ /२६**
**क्र.मुमाआ/नों.क्र.२०१०९३ / २० /अ.क्र.६६४ /२६**
**क्र.मुमाआ/नों.क्र.२०१०९४ / २० /अ.क्र.६६५ /२६**

श्री. संजय गो. धुवाळी
४/३०५, रचना बिल्डिंग,
नवी चिखलवाडी, एन.बी.मार्ग,
ग्रॅन्ट रोड (प), मुंबई – ४००००७.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.)
'डी' विभाग (प्र.) बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक अभियंता (इ. व का.)
डी विभाग, ३ रा मजला, डी विभाग मनपा कार्यालय इमारत, जोबनपुत्र आवार,
नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई - ४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.)
'डी' विभाग (प्र.) बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी अभियंता (इ. व का.)
डी विभाग, ३ रा मजला, डी विभाग मनपा कार्यालय इमारत, जोबनपुत्र आवार,
नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई - ४०० ००७.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता) डी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त डी विभाग यांचे कार्यालय,
महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला, जोबनपुत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँड रोड (प.), मुंबई - ४०० ००७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, डी विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त डी विभाग
यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, ग्रँड रोड (प.), मुंबई - ४०० ००७.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०१.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीस अपीलार्थी हजर असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वतीने कोणीही उपस्थित नसल्याचे आढळून येते. तसेच प्रस्तुत प्रकरणी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी स्थगित करण्यात आली होती.

Jyotsna

आज झालेल्या सुनावणीत जन माहिती अधिकारी किंवा प्राधिकरणाच्या वतीने कोणीही हजर नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता तसेच अपिलार्थीनी मुद्दा क्रमांक एक ते आठ यातील मुद्दा क्रमांक पाच सोडल्यास इतर कुठलीही माहिती प्रदान केली नसल्याचा आक्षेप लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज पूर्णतः मंजूर करीत अपिलार्थी यांच्या दिनांक १८/१०/२०१९ रोजीच्या मूळ जोडपत्रामधील मुद्दा क्रमांक एक ते आठ यातील माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी विनामूल्य प्रदान करावी तसेच अपिलार्थीच्या **जोडपत्र ब व द्वितीय अपील अर्जात** त्यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचा आक्षेप नोंदविला आहे व त्यावर **जन माहिती अधिकाऱ्यांनी अद्याप पर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही त्यामुळे त्यांच्यावर रुपये २५,०००/- इतकी शास्ती का लादण्यात येऊ नये याचा आयोगात व्यक्तिशः हजर राहून खुलासा सादर करावा** या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २०-०१-२०२६**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★

Jyotsna